आज़ादी का
अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

**(A Peer Reviewed)**

Year - 8, Vol. I, Issue- LXXI, Sept. 2022

- Cheif Editor -
**Dr. Prakasha N.**
Associate Professor
Post-Graduation Department of Studies in Economics
Maharani's Arts College for Women Mysuru, Karnataka.

- Editor -
**Dr. Amit Mirji**
Assistant Professor & HOD
Department of First Grade College, Sindagi,
Vijayapura, Karnataka.

## Quartly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

| | | | |
|---|---|---|---|
| 32. | A STUDY ON CUSTOMER SATISFACTION TOWARDS SUKANYA SAMRIDHI SCHEMES IN DEWAS CITY | Dr. Keshav Mani Sharma<br>Yogita Marmat | 163 |
| 33. | HOMOEOPATHIC MANAGEMENT OF BENIGN PROSTATE HYPERTROPHY & IT'S REPORTORIAL APPROACH: A CASE DISCUSSION | Dr. Jagdish Darakh<br>Dr. Maryam | 166 |
| 34. | RANDOMIZED CLINICAL TRIALS OF VIRECHANA KARMA & NAVAK GUGGULA IN THE MANAGEMENT OF STHOLYA (OBESITY) | Dr. Ajit Hawale1<br>Dr. Anand K. Bora | 171 |
| 35. | THE CONSTITUTION OF INDIA : A SOURCE OF LEARNING VALUES | Dr. Gawalwad Maroti Chandu | 179 |
| 36. | "AN ANALYTICAL STUDY OF INSURANCE CLAIM SETTLEMENT RATIO" | Dr. Atish Uttamrao Rathod | 187 |
| 37. | LEFT WING EXTREMISM - A WAR UPON THE STATE | Asst. Prof. A. S. Kousadikar | 194 |
| 38. | NEED OF MANDATORY MILITARY TRAINING: FORESIGHT OF NETAJI SUBHASHCHANDRA BOSE | Rashmi A. Kousadikar | 201 |
| 39. | "HUMAN RESOURCE SUSTAINABILITY:IN INDUSTRIAL MANAGEMENT" | Miss. Sunanda Angadi | 206 |
| 40. | अनुमान प्रमाण में अर्थापत्ति का अन्तर्भाव | डॉ0 मधु बाला सिन्हा | 210 |
| 41. | समाजसुधार और साहित्य : एक समाजशास्त्रीय विवेचन | Dr. Usha Kiran Tiwari | 214 |
| 42. | हिन्दी के आंचलिक उपन्यासों में जीवन मूल्य | डॉ० समयलाल प्रजापति<br>विनीता ठकरेले लोधी | 218 |
| 43. | "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथप्रेम" | प्रा. डॉ. टापरे ए. डी. | 222 |
| 44. | "मुस्लिम मराठी कवितेतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद" | शेख शफी बोल्डेकर | 225 |
| 45. | बंजारा समाजातील स्त्रियांचे सामाजिक जीवन .. | डॉ. लक्ष्मण एस. पवार | 230 |
| 46. | मेरी सेवाओं के प्रस्ताव<br>(समस्त बिन्दुओं को अपनी रुचियों, इच्छाओं, परिस्थितियों व आवष्यकताओं से जोड़कर भाष् करें) | सुमित कुमार राय | 235 |
| 47. | भारतीय शेती आणि प्रसार माध्यमे | संदीप रामराव काळे<br>प्रा. डॉ. आशा देशपांडे मॅडम | 240 |
| 48. | भारतातील उद्योग क्षेत्रातील साठ वर्षातील प्रगतीचा आढाव | प्रा डॉ भागवत सुखदेव परकाळ | 249 |
| 49. | ಅಮಲನಕಥೆ: ಒಂದುವಿಶ್ಲೇಷಣೆ | ಡಾ. ಜಗದೀಶಟಿಎಲ್ | 253 |

सांभाळावा. सौभाग्याचे प्रतीक म्हणून पुरुष ही संस्कृतीने बंदिस्त करून टाकले आहे. त्यामुळे तिला वेगाने हालचाल करता येणार नाही. ती कुठेही जाणार नाही. जरी गेली तरी पायातील अलंकारामुळे तिची चाहूल लागेल अशी पुरुषांची धारण आहे. म्हणून पुरुषांनी संस्कृतीच्या नावाखाली स्त्रियांना बंदिस्त करण्याचे गोड कठकारस्थान केलेले दिसून येते.

या समाजात विवाहित स्त्रीच्या बाबतीत फार कठोर निर्णय, नियम होते. सकाळी उठताना तिचा घुंगट असलाच पाहिजे. सासू-सासऱ्यांना सकाळी गरम पाणी काढून देणे. त्यांची पाठ घासणे संध्याकाळी त्यांचे अंथरून टाकणे, पाय चेपून देणे, असे काम करणारी सून म्हणजे फार चांगले असे काम केले नाही तर ती वाईट. ही धारणा आजही या समाजात आहे. म्हणून सकाळी चार वाजता उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत ती सतत कामात असायची. अशावेळी कितीही शरीर थकले तरी ती सहन करायची. त्यामुळे तिचे अतोनात हाल होत असे. या सर्व बाबी जंगलाच्या सानिध्यात मुख्य संस्कृती पासून दूर असल्यामुळे व्हायच्या. म्हणजे तिचा वापर या समाजातही वस्तू सारखाच व्हायचा परंतु आज ती शिक्षणामुळे सुशिक्षित झाले. चांगले काय? वाईट? हे कळू लागले त्यामुळे समाजातील तिचे स्थान थोडेफार सुधारताना दिसते.

एकंदरीत, बंजारा समाज जंगलाच्या सानिध्यात जीवन जगत असल्यामुळे आणि मुख्य संस्कृतीच्या प्रवाहा बाहेर फेकल्या गेल्यामुळे शिक्षणापासून आणि मानवी सोयी सुविधांपासून कोसळ दूर गेल्यामुळे स्त्रियांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन फारसा चांगला. स्त्रियांचा अधिकार केवळ चूल आणि मूल या पुरतेच मर्यादित . असा त्यांचा भ्रम. जंगलांच्या नियमानुसार जो बलशाली त्यांचीच. यामुळे ते अशा प्रकारची हुकूमत स्त्रीवर गाजवीत असेल. समाजात तिला दुय्यम स्थान होते. परंतु या सर्व गोष्टीला जबाबदार कोण आहे. तर ते आहे शिक्षण .आज शिक्षणाची गंगा तांड्याच्या दारावर जाऊन पोहोचलेली आहे. ज्यांची जशी क्षमता आहे त्यांनी शिक्षणरूपी गंगेचे पाणी प्यावे. त्यामुळे तांड्यातील लोकांची वैचारिक पातळी वाढलेली आहे .परिणामी स्त्री, पुरुष वंशाचा दिवा हा भेदाभेद नाहीसा होताना दिसते. मुलगा झाला पाहिजे असा आग्रह आज पाहावयास मिळत नाही. मुलगी किंवा मुलगा जन्माला घालणं स्त्री च्या हातात नाही. ते वैज्ञानिक आधार आहे ते गुणसूत्रावर अवलंबून आहे. ही वैचारिक, वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात निर्माण झाली आहे. इतर संस्कृतीच्या संपर्काने त्यांच्या जीवनशैलीत बदल झाला. 'भाषा' पोशाख, खान - पान याबाबतीत क्रांतिकारी बदल झालेला आहे. त्यामुळे आज समाज जीवनात स्त्रियांना मानपान मिळतो. दैनंदिन व्यवहारांमध्ये तिचा सल्ला घेतल्या जाते. संस्कृतीचे कुठेही प्रदर्शन केले जात नाही. त्यामुळे आज गाव किंवा शहरात ही स्त्रीबंजारा समाजाची आहे की कोणत्या समाजाची आहे. हे कळत नाही. हा बदल केवळ शिक्षणामुळेच झालेला आहे. हे निर्विवाद पणे आज सांगता येते.

संदर्भः –


१) लोकजीवन आणि लोकसंस्कृती. प्रा. दत्ता भगत पृ. प्रस्तावनेतून

2) बंजारा समाज, संस्कृती आणि स्त्री. डॉ. लक्ष्मण पवार पृष्ठ 159.

3) बंजारा लोकजीवन पद्धती डॉ. रुक्मिणी पवार पृष्ठ . 87 .

4) गोर बंजारा समाजाची ओळख. राठोड ग. ह. पृ. 44

5) बंजारा लोकगीतं का सांस्कृतिक अध्ययन गणपत राठोड पृ. 60.

# बंजारा समाजातील स्त्रियांचे सामाजिक जीवन ..

डॉ. लक्ष्मण एस. पवार
मराठी विभाग, हु. जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर.

भारतीय संस्कृती ही पवित्र आणि तेजस्वी असून विविधतेने नटलेली आहे. त्यामध्ये अनेक जाती, धर्म, पंथ गुण्यागोविंदाने एकत्र नांदतात. या जाती अनादी अनंत काळापासून मौखिक शब्द अविष्काराद्वारे आपल्या संस्कृतीचे संवर्धन आणि संगोपन करीत आहेत. त्यापैकीच बंजारा ही एक जात आहे. ही जात अति प्राचीन आहे. मोहनजोदडो हडप्पा संस्कृतीचे संपूर्ण अवशेष यात आजही जशाला तसे पाहावयास मिळतात. म्हणून बंजारा समाजातील अभ्यासक प्रा. मोतीराज राठोड यासारख्या संशोधकांनी बंजारा जातीला सिंधू संस्कृती पर्यंत नेऊन पोहोचविले आहेत. हिंदू धर्माची अति प्राचीन संस्कृती म्हणून सिंधू संस्कृतीकडे पाहिल्या जाते. या संस्कृतीतील चालीरीती, रूढी -परंपरा, सण उत्सव, राहणीमान यासारख्या गोष्टी पाहिल्या तर दोन्ही संस्कृतीमध्ये एकरूपता आहे. असे वाटते. म्हणून हा वारसा हिंदू धर्मातील लोकांनी लोक साहित्याच्या व सण उत्सवांच्या माध्यमातून आजपर्यंत जोपासलेला आहे. इतर संस्कृतीच्या प्रभावामुळे आज त्यात थोडेफार बदल झालेले पाहावयास मिळते. असेच संस्कृतीमधील बदल झालेली मुख्य जमात म्हणजेच बंजारा.

हिंदू धर्मातील मुख्य जमात म्हणून यांच्याकडे पाहिल्या जाते. हिंदू धर्मातील सर्व परंपरा आजही त्या पाळतात. परंतु धर्माचे एक घटक असूनही त्यांना गावाच्या आत कधी स्थान मिळाले नाही ते गावकुसाबाहेरच राहिले. मुख्य प्रवाहापासून कोसो दूर गेलेल्या या समाजाने आपली स्वतंत्र संस्कृती निर्माण केली. हिंदू धर्माच्या परंपरा संस्कृती पाळत असतानाही या समाजाने आपली संस्कृती का निर्माण केली? याचे उत्तर मात्र आज हिंदू संस्कृतीचे रखवालदारही देऊ शकत नाहीत. त्यांना तशी गरजही वाटली नसावी. नाही परंतु धर्मांतर असो की लव जिव्हाद असो. अशावेळी धर्म मात्र अडवा येतो. संस्कृती आडवी येते आणि तुमचा धर्म हिंदू आहे असे म्हणून त्यांचा छळच केल्या जातो अशा काही पाखंडी दुहेरी भूमिका असणाऱ्या लोकांमुळे बंजारा समाजांना आपली ओळख निर्माण करण्यासाठी स्वतंत्र संस्कृतीच निर्माण करावी लागली आहे .

बंजारा समाजाचा इतिहास ज्याप्रमाणे अभ्यासकांनी सिंधू संस्कृतीची जोडला आहे. त्याप्रमाणे त्यांचा इतिहास राजस्थानाशीही जोडला गेला आहे. ते मूळ राजस्थानाचे क्षत्रिय राजपूत आहे हे वारंवार सांगण्याची गरजच अभ्यासकांना पडली नाही. तेथील आचार विचार, खानपान, पोशाख बोलीभाषा या सर्व बाबी पाहिल्या तर आजच्या संपूर्ण देशात विखुरला गेलेला बंजारा समाज यात एकरूपता दिसून येते म्हणून निशंकपणे हा समाज राजस्थानाचाच होता. हे सिद्ध अभ्यासकाने करून दाखविले आहेत. अनेक ऐतिहासिक संदर्भ त्या ठिकाणी आज मिळतात. चितोडगडचा राजा पृथ्वीराज चव्हाण, आला उदल हे सर्व आजही बंजारा संस्कृतीच्या लोकसाहित्यांमध्ये मुखोद्गत आलेले आहेत. फरक एवढाच झाला की ज्यावेळी इंग्रज भारतात आले त्यावेळी या राजपूत राजांनी त्यांच्याबरोबर युद्ध केले. शेवटी हार झाल्यानंतर त्यांना जीव वाचविण्यासाठी जंगलाचा आश्रय घ्यावा लागला. जर यावेळी त्यांच्याबरोबर इतर राजे लढले असते तर कदाचित ही वेळ त्यांच्यावर आली नसती .

बंजारा समाज व्यापारी आहे. पूर्वीच्या काळी जेव्हा ते राजस्थानत होते. त्यावेळी व्यापार हाच त्यांचा मुख्य व्यवसाय. व्यापार करण्यासाठी त्यांनी त्यांना पशु लागायचे. व्यापार करणे मुघलांना रसद पुरवठा करणे आणि वेळप्रसंगी युद्धही करणे ही त्यांची नित्याचीच कामे. म्हणून व्यापाराच्या निमित्ताने ते देश विदेशात पोहोचलेले आहेत. मुघल राजांनी जंगी भंगी नाईकांना सवलत दिली होती. हे हैदराबादच्या बंजारा व्हिला या प्रांतावरून सिद्ध होते. ज्या ज्या ठिकाणी मुघलांचे घोडे असतील त्या ठिकाणी नाईकांचे बैलगाय असतील असा आदेश त्यांना दिलेला होता. म्हणून इतरांच्या राजवटीतही त्यांना मानपान प्रतिष्ठा काय असेल याची कल्पना येते. परंतु भारतात इंग्रजांच्या आगमनाने रेल्वे आली आणि त्याबरोबरच या समाजाचा संपूर्ण व्यापारच बुडाला याच काळात रेल्वे लुटणे आणि इंग्रजांना अप्रत्यक्ष त्रास देणे हे क्रांतिकारी पाऊल बंजारा समाजाने केले आहे. त्यामुळे इंग्रजांनाही गुन्हेगारी जमातीचा कायदा करावा लागला. मिळेल त्याला तारेच्या कुंपणात कोंडले. तेव्हा जीव वाचवण्यासाठी त्यांनी जंगलाचा आश्रय घेतला. त्या जंगलात उपजीविकेसाठी जे मिळेल ते घेतले. जंगलाच्या सानिध्यात जीवन जगता यावे म्हणून गावकुसापासून दूर राहिले. डोंगर पायथ्याशी तांडे उभारून शेती करणे, गुरे पालन करणे यासारखी कामे त्यांनी केले. आम्ही कोण आहोत? कुठले आहोत आहोत. हे इंग्रज लोकांना कळू नये यासाठी त्यांनी आपल्या जीवनशैलीत बदल केला. पोशाख, भाषा संस्कृती इत्यादी सर्व काही बदल घडवून आणले. म्हणून आजही बंजारा समाजाची संस्कृती स्वतंत्र आणि बेधुंद मनसोक्त जीवन जगायला लावणारी आहे. अशा संस्कृतीला वाढविण्यासाठी जी भूमिका स्त्रीची आहे तेवढी भूमिका पुरुषांची नाही. पुरुष मदहोश जीवन जगण्यासाठी प्रसिद्ध आहे .

अशा संस्कृतीचे संवर्धन आणि रक्षण करणाऱ्या स्त्रियांचे सामाजिक जीवन मात्र अफलातून आहे. त्यांनी आपले सर्व जीवन संस्कृती संवर्धनासाठीच खर्च केले आहे. असे सांगता येईल की हिंदू धर्मातील बाराही सण उत्सव त्या आपल्या आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करतात. रानात वसलेली आणि कडा कपाऱ्यातून आपला बुलंद आवाज उठविणारे निसर्गाला साथ घालणारी ही भटकी विमुक्त गोर बंजारा संस्कृती आहे. आज फारशा प्रमाणात पाठबळ नसतानाही ती काळाच्या प्रवाहात हजारो वर्षांपासून टिकून आहेत. यासाठी पुरुषांपेक्षा स्त्रीची भूमिका अधिक आहे. या संस्कृतीत स्त्रियांचा आणि गीतांचा घनिष्ठ सबंध आहे. त्या गीतातूनच संस्कृतीचे संवर्धन करतात गीताला आणि तिला वेगळे करणे म्हणजे आईला आणि बाळाला वेगळे केल्यासारखे होईल. म्हणून संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीने स्त्रीला समाजात आगळे वेगळे महत्त्व आहे आणि होते. हे निशंकोचपणे सांगता येईल.

बंजारा समाजात मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती. त्यामुळे कुटुंब आणि समाजातील सर्व अधिकार स्त्रीला होते. याबाबतीत दत्ता भोसले यांचे विचार उल्लेखनीय म्हणावे लागेल,' त्यांच्या मते वैदिक संस्कृतीच्या पूर्वी इथे जी आर्योतराचीप्रगत संस्कृती नांदत होती तिच्यामध्ये प्रजनन आणि

सुफलीकरण यांना विशेष महत्त्व होते. किंबहुना या सर्व बाबी या दोन भोवतीचा फेर धरणारे आहेत. यासाठी या संस्कृतीने भूमी आणि स्त्री यांच्याकडे एक तत्त्वाच्या भावनेने पाहिले आहे. भूमीच्या सुफलीकरणासाठी आणि अधिक धन धान्यासाठी स्त्रीचा वापर करण्यात आला आणि स्त्रीच्या सुपलीकरणासाठी प्रजननासाठी भूमीचा आधार घेतलेला दिसतो (१|).

या सर्व बाबींचा विचार केला तर बंजारा समाजातील स्त्री अपवाद नाही. एवढेच सर्व अधिकार बंजारा स्त्रीला असल्यामुळे एक हाती सत्ता तिच्याकडे असणे अपरिहार्यच आहे.

पण पतीकडे आणि म्हातारपण मुलांकडे अशा क्रमामुळे तिचा विकास खुंटला. त्यामुळे या समाजातीलच नव्हे तरइतरही समाजात त्यांना दुय्यमच दर्जा प्राप्त झालेला दिसतो. यांचे मूळ कुठे असेल तर ते आहे पुरुषांच्या समाज व्यवस्थेत. जोपर्यंत ही समाजव्यवस्था उध्वस्त होणार नाही, तोपर्यंत स्त्रियांचे सामाजिक जीवन सुधारल्या जाणार नाही.

बंजारा समाजाने जीवन जगण्यासाठी जंगलाचा आश्रय घेतला. त्यामुळे या जंगलशाही वातावरणात जो बलशाली आहे त्यांचेच हुकूमत चालत असे. उपजीविका करण्यासाठी जंगलातील उपलब्ध साधनसामग्रीचा वापर त्यांनी केला. जे मिळेल जसे मिळेल ते त्यांनी मिळविले. त्यामुळे शिकार करणे, मोहफुल वेचणे इत्यादी कामे त्यांनी करावी लागायची. शेती आणि पशुपालन हा त्यांचा मुख्य व्यवसाय बनला. या सर्व बाबींचा परिणाम स्त्रीच्या जीवनावर पडणे साहजिकच होते .त्यामुळे त्यांच्यात बहुपत्नीत्वाची पद्धत अमलात आली, 'एकापेक्षा अनेक स्त्रियांशी लग्न करणे शौर्याचे लक्षण समजले जाते. तसेच पहिल्या पत्नीपासून मूल होत नसतील, ती रोगी असेल तर बंजारा दुसऱ्या स्त्रीसोबत विवाह करतात.'(3) अशावेळी ज्या ठिकाणी बहुपत्नी व्यवस्था आहे त्या ठिकाणी तिच्यावर अन्याय होणारच. यात काहीही शंका नाही.

मुलींच्या जन्माविषयी या समाजात उत्सुकता दिसून येत नाही .मुलांच्या जन्माच्या वेळी तांड्यात नंगारा वाजवून जन्मोत्सव साजरा केला जातो. धुंड, बारसे यासारख्या विधी जोरात केल्या जातात. गावागावात दवंडी दिल्या जाते. परंतु मुलींच्या बाबतीत असे घडताना दिसून येत नाही. ती दुसऱ्यांच्या घरचे धन आहे. ती वंशाचा दिवा नाही म्हणून तिच्यावर लहानपणापासूनच मर्यादा टाकल्या जातात.

आज कित्येक कुटुंबात मुलगा जन्माला यावा म्हणून गर्भातच मुलींची हत्या केली जाते. एवढ्यावरच हा समाज थांबत नाही तर या स्त्रीकडून सर्व मुलींच होतात .ती घराला वारसा देऊ शकत नाही म्हणून घरातील स्त्रियांच स्त्रीचा छळ करतात. म्हणून हा समाज स्त्रियांच्या बाबतीत अजूनही फारसा जागृत झालेला नाही. हा त्यांच्याही हा त्यांचाही दोष नाही बंजारा जंगलाच्या सानिध्यात असल्यामुळे त्या ठिकाणी मुख्य व्यवसायाबरोबर उन्हाळ्यातील जंगलात मिळेल ती कामे केली जाते. त्यातच मोहबुल वेचणे हे एक काम आहे बोटी आणि बाटी हा त्यांच्या आवडीचा आहार आणि त्याबरोबर जंगलातून फुकटात मिळालेली मोह फुले. त्या फुलांची दारू यामुळेच तर स्त्रियांचे जीवन नरकात गेल्यासारखे वाटते. बाराही महिने तांड्यात घराघरात व फुलांची दारू काढतात. त्यामुळे नशेत असलेल्या पुरुषांचे लक्ष कुटुंबावर नसते. परिणामी बाई पोरींना घराची पूर्ण जबाबदारी उचलावी लागते. कष्टांचे कामे करावी लागतात. एवढ्यावरच ते थांबत नाही तर दिवसभर दारू पिऊन आलेला नवरा पत्नीला छळतो. अशावेळी तो लाथ्या काठ्यानेही मारतो. हे कृत्य करत असताना त्यांना सोडवण्यासाठी कोणी येऊ नये असे पतीला वाटते. ही माझी बायको आहे मी मारेल की काही करेल तुम्हाला देणे घेणे नाही, म्हणून दारूच्या नशेत आतूनच छळ करीत असतो. त्यामुळे ब्र शब्द काढण्याची मुभा बंजारा समाजात स्त्रीला नव्हती. परंतु आधुनिकीकरणामुळे काही प्रमाणात तिला तिचे हक्क आज मिळताना दिसते. एवढी अवहेलना इतर कोणत्याही समाजात झालेली नसेल.

स्वतःच्या स्वार्थासाठी पुरुषांनी तिला बंदिस्त करून टाकले. संस्कृतीच्या नावाखाली बंजारांनी पोशाख अलंकार याबाबतीत कमालीची चतुराई दाखविली आहे. नऊ मीटरचा लेंगा, चोळी, डोक्यावर अटी - चोटला, पायात, हातात -बलिया तेही घुंगुराने युक्त. अशा सर्व बाबीवरून असे दिसते की तिला संस्कृतीच्या गोंडस नावाखाली पुरुषांनी जागोजागी खिळले आहे. तिला दिवसभर कामतर करावी परंतु दिवसभर पोशाख ही

या समाजात मातृसत्ताक पद्धती असल्यामुळे कुटुंबावर संपूर्ण देखरेख तिचीच असायची त्यामुळे एकत्र कुटुंब पद्धती त्यांच्या दीर्घकाळापर्यंत अस्तित्वात होती. परिणामी कुटुंबासाठी सर्व निर्णय घेण्याच्या अधिकार तिला मिळाले परंतु ही मातृसत्ताक पद्धती फार काळ टिकलेली नाही. इंग्रजांच्या आगमनामुळे त्यांच्या जीवनशैलीत अपरंपार बदल घडून आणले. स्त्रीच्या हातातील सत्ता गेले. ती सत्ता पुरुषांच्या हातात आलत्यामुळे त्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल झालेला पाहावयास मिळतो. तिचे अधिकार संपले. जीवनशैली बदलून गेली. व्यापक नजरेने जसे पूर्वी स्त्रीला भूमी सोबत तुलना करीत गेले. ते आज राहिलेले नाही. स्त्रीही पुरुषांची मालमत्ता झाली. वस्तूसारखा तिचा वापर होत राहिला. ती घरात शोभेची वस्तू बनवून राहिली. परिणामी तिला अनेक यातनांना सामोरे जावे लागले. चूल आणि मूल एवढ्यावरच तिचअस्तित्व राहिले. त्यामुळे जीवनात जेवढा यातना भोगावे लागल्या तेवढ्या यातना कोणत्याही समाजातील स्त्रीला भोगाव्या लागल्या नसतील.

मातृसत्ताक पद्धती जाऊन आज बंजारा समाजात पितृसत्ताक पद्धती आली. पुरुषाने सांगावे व त्यांनी ऐकावे त्यामुळे तिचे जगण्याचे स्वातंत्र्य मर्यादित झाले. जाहीरपणे त्यांना आपल्या भावना माडता येत नव्हत्या. म्हणून त्यांनी त्यांच्या व्यथा, वेदना, भावना मांडण्यासाठी गीतांचा आधार घेतला. याद्वारे निर्भीडपणे मनातील विचार सण उत्सवाप्रसंगी मांडू लागल्या. एवढे स्वातंत्र्य पुरुषशानी त्यांना पूर्वीही दिले आणि आजही दिलेले आहेत. परंतु काही वेळा मात्र त्यावर पुरुषांचाच अधिकार चालतो. त्यांच्याच परवाना घेणे सगळ्या गोष्टी कराव्या लागतात.

स्त्रियांनी आपल्या भाव विश्वांचे सादरीकरण करण्यासाठी प्रारंभी जात्यावरच्या ओळींचा आधार घेतला आहे. यातून गीतांचा जन्म झाला. यांनी स्त्रीच्या जीवनात आनंद निर्माण झाला. विकासापासून व शिक्षणापासून कोसदुर असलेली बंजारा स्त्री फारच उपेक्षित जीवन जगणारी आहे. इतर समाजाप्रमाणे या समाजातही तिला कनिष्ठतेची वागणूक दिली जाते. तिच्या भावविश्वांचा व स्वप्नांचा कोडमारा होतो. कौटुंबिक जीवन सामाजिक जीवन जगताना तिच्या मनाचा मनात साठवून ठेवलेल्या भावना अनावर होऊन ओठावर येतात. त्यामुळे त्यांच्या मनाचा निचरा होतो .आज या समाजात पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रीला दुय्यमस्थान आहे. तिच्या मनाचा कोंडमारा होतो . जर एखाद्या स्त्रीचे आई-वडील मृत्यू पावले असतील. अशाप्रसंगी समाज त्या स्त्रीला जवळ घेत नाही . तुच्छतेच्या दृष्टीने तिच्याकडे पाहिल्या जाते. स्त्रियाही तिला जवळ येऊ देत नाहीत. तेव्हा ती आपल्या मनातील वेदना गीतांच्या आधारे समाजासमोर व्यक्त करते. ती म्हणते',

बलाबला कोचो,
म केती बला,
याडी बाप मरगे,
करणं वेगे वेला'
मन आयदो सतळों झुरलेम ये' (2).

या समाजातील स्त्री गीताचे निर्मिती ही प्रसंग पाहून करते. ज्या समाजाने तिला वाईट टाकले अशांना ती स्वतःच्या दुःखाची जाणीव करून देते. परंतु हक्क सांगण्याचा किंवा त्रास होत आहे असे म्हणण्याचा अधिकार दिला नाही. प्रस्तुत गीता एका मुलींचे आई-वडील वारलेले आहेत अशावेळी समाज तिला वाळीत टाकतो तेव्हा तिच्या मनातली घालमेल ती गीताद्वारे समाजापुढे मांडते. एवढाच काय अधिकार आजही या समाजातील स्त्रिया संस्कृतीने दिलेला आहे. आज समाजाने तिचे अस्तित्व मर्यादित करून तिला परावलंबी केले आहे. बालपण वडिलांकडे तरुण

ढसाळांच्या या कवितेप्रमाणे बाबासाहेब सर्वांच्या घराघरात सूर्य नेण्याचे कार्य केले आहे . ज्या ठिकाणी अंधार आहे त्या ठिकाणी प्रकाश करण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले .त्यामुळे सर्व समाज उदयोन्मुख झाला .आणि हजारो वर्षापासून अनिष्ठ रूढी प्रथा परंपरेच्या जखडलेल्या वेढ्यातून मुक्त झाला आहे

भारतातील सर्व समाज प्रारंभी पासूनच मुक्तजीवन जगणारा .जंगलांच्या सानिध्यात राहणारा .निसर्गावर प्रेम करणारा असे असूनही नाना प्रकारे त्यांचा छळ झालेला आहे .त्यांना संविधानात केलेल्या तरतुदीनुसार त्यांचे हक्क मिळालेले नाही . त्या तरतुदीचीअंमलबजावणी केली गेली नाही . त्यामुळे आज महाराष्ट्र राज्यात त्यांना वेगवेगळया मवलती खाली जीवन जगावे लागते आहे. तो भटका असला तरी त्यांना भटक्यांच्या सवलती नाहीत. हा केवढा अन्याय ?उदाहरण द्यायचे झाले तर बंजारा समाजाचा देता येईल प्रारंभी पासूनच विमुक्त भटका जीवन जगणारा हा समाज स्वतंत्र भारतात विखुरला गेला . असे असूनही भारताच्या वेगवेगळया राज्यात त्यांना वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते . हा किती मोठा अन्याय तेव्हा या समाजाचे नेते बाबासाहेबांचे ऐकले असते तर आज हा समाज अनुसूचित जमाती बरोबर राहिला असता .परंतु तसे झाले नाही भारतातील बंजारा समाजाला एकाच जातीचे आले नाही हा या समाजाचा किती मोठा पराभव म्हणावा लागेल .बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या दैनंदिन जीवनावर पडलेला आहे . यात कुठलीही शंका नाही . विशेषकरून स्त्रियांच्या स्त्रियांवर अधिक प्रभाव आहे . नवस-सायास अंधश्रद्धा या प्रकारामध्ये त्या आता गुरफटत नाहीत .तर त्या म्हणतात बाबा साहेबांच्या

आशीर्वादामुळे आम्हालाही शिक्षणाचा अधिकार आहे .हे समाजापुढे स्पष्ट सांगतात ही ताकद केवळ कोणामुळे तर ती संविधानामुळेच .संविधान नसते तर आज या समाजांची नव्हे तर सर्वच बहुजनांची काय अवस्था झाले असते ही कल्पना न केलेलीच बरी .

एकंदरीत डॉ .बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचेच समाज सुधारक नव्हते तर ते तमाम मानव जातींच्या मानव जातींचे समाजसुधारक आहेत .निसर्गदेवतेच्या नियमानुसार स्त्री-पुरुष भेदाभेद नसून ते एकच आहे .त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेद नाही आहे म्हणून प्रत्येकांना प्रत्येकांच्या हक्क मिळाले पाहिजे .यासाठी स्वतंत्र भारताला एका संविधानामध्ये बांधून सर्वांत प्रति समान न्याय हा विचार प्रत्येक समाजामध्ये रुजवण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले आहे. म्हणूनच आज प्रस्थापितांच्या जोखडा मधून सर्वच समाजातील स्त्री-पुरुष आणि तमाम जाती मुक्त जीवन जगताना दिसतात .स्त्रियांना त्यांचे हक्क मिळाले . चूल आणि मूल यांच्या जोखडातून मुक्तता झाली आणि ज्या ठिकाणी मानवी मूल्यांचा अंधार आहे ,त्या ठिकाणी मानवी मूल्यांचा सूर्यच बाबासाहेबांनी पोहोचविलेला आहे .म्हणून म्हणता येईल की ,ज्यांना चालता येत , बोलता येत नव्हते ते बाबासाहेबांच्या आगमनाने आणि संविधानाने मजबूत झाले .त्यामुळे प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या संस्कृतीला लक्ष लक्ष हादरे बसले .तडे गेले त्यांच्या संस्कृतीचा एवढा मोठा स्पोट झाला की 'हजारो वर्षापासून मुके असलेले बोलू लागले ,ज्यांच्या पायात बळ नव्हते ते वाऱ्यालाही गुलाम करू लागले ' किमया केवळ बाबासाहेबांच्या सामाजिक विचारांमुळेच झाली .त्यामुळे हजारो

वर्षापासून रूढी -प्रथा परंपरा ,नवस-सायास यात गुरफटलेल्या समाजाला मोकळा श्वास घेता आला ...संदर्भग्रथ ..

१ . शुद्र पूर्वी कोण होते ? - डॉ. बाबासाहेब आंबेडकर - P - 46 .

2. स्त्री - पुरूष तुलणा- ताराबाई शिदे - P-36

3 . आधुनिक युगातील स्त्रिया - स्वामी रामनाथन - P -११ .

४ . शुद्र पूर्वी कोण होते ? - डॉ. बाबासाहेब आंबेडकर -P - ९

५ . दलित साहित्य : उद्गम आणि विकास - P-37

६ -दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह -भालचंद्र नेमाड –
P 22 .